नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २८३<br>Issue - 283 | वार गुरुवार दि. ५ मार्च २०२६<br>Blow- Thursday Date 5 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# श्रीलंकेजवळ इराणच्या युद्धनौकेवर पाणबुडीद्वारे क्षेपणास्त्राचा मारा

## भारताच्या वेशीवर झाला हल्ला; ८० जणांचा मृत्यू, श्रीलंका नौदलाकडून हल्ल्याला दुजोरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पाचव्या दिवशी देखील कायम आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. याच दरम्यान हिंदी महासागरात अमेरिकेनं पाणबुडीचा वापर करत इराणच्या युद्धनौकेवर हल्ला केला, यात ८० जणांचा मृत्यू झाला आहे. युद्धनौकेतून प्रवास करणारे अनेक जण जखमी झाले आहेत. इराणी युद्धनौकेकडून संकटाचा अलर्ट देण्यात आल्यानंतर श्रीलंकेच्या सैन्यानं बचाव कार्य आणि शोध कार्य सुरु केलं.



श्रीलंकेच्या नौदलाकडून आणि संरक्षण मंत्रालयाकडून या हल्ल्याला दुजोरा देण्यात आला आहे. इराणच्या जहाजावर एकूण १८० लोक होते, त्यापैकी ८० जणांचा मृत्यू झाला आहे. तर, ३२ जणांना वाचवण्यात यश आलं असून काही जण बेपत्ता आहेत.

श्रीलंकेच्या संरक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलेल्या माहितीनुसार इराणच्या जहाजाकडून आपत्कालीन सिग्नल मिळाल्यानंतर श्रीलंकेच्या नौसेनेकडन बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे.

श्रीलंकेच्या नौदलाकडून इराणच्या जहाजावरील ३२ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. आता त्यांच्यावर रुग्णालयात उपचार आहेत. श्रीलंकेच्या विदेश मंत्री विजिता हेराथ यांनी म्हटलं की बुडणाऱ्या जहाजातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी किनाऱ्यावर आणलं गेलं आहे.

अमेरिकेचे संरक्षण विभागाचे सचिव पेटे हेगसेठ यांनी हिंदी महासागरामध्ये टॉरपॅडोचा वापर करुन इराणच्या युद्धनौकेवर हल्ला केल्याचं म्हटलं. त्यांनी इराणच्या युद्धनौकेचं नाव सांगितलं नाही.या हल्ल्यासाठी अमेरिकेनं टॉरपॅडोचा वापर केल्याचं बोललं जात आहे. हेगसेठ यांनी इराणकडून डोनाल्ड ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला गेल्याचा दावा केला. अमेरिकेनं इराणच्या युद्धनौकेवर केलेल्या हल्ल्याचा व्हिडिओ देखील जारी केला आहे.

दरम्यान, इराणची खठखड ऊशपर आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्यू २०२६ मध्ये सहभागी झाली होती. हा कार्यक्रम विशाखापट्टणम येथे पार पडला होता. यानंतर इराणची युद्धनौका परत निघाली होती.

# परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित परत आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : युद्धजन्य परिस्थितीमुळे काही देशांची हवाई वाहतूक सेवा बंद झाल्यानंतर परदेशात अडकलेल्या भारतीयांबाबत राज्य शासन सतर्क असून त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य संजय केनेकर, ड. निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, ड. अनिल परब, शशिकांत शिंदे यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे परदेशात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन करत असलेल्या उपाययोजनासंदर्भात प्रश्न विचारला होता.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हवाई वाहतूक सेवा बंद झाल्यानंतर पर्यटक, व्यावसायिक तसेच ट्रान्झिटमध्ये असलेल्या नागरिकांचे संदेश आल्यानंतर तत्काळ केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधण्यात आला. त्याचबरोबर संबंधित देशांतील भारतीय दूतावासांना सक्रिय करण्यात आले असून नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नागरिकांसाठी विशेष व्हॉट्सप हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला असून त्यावरून येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मंत्री महाजन यांनी व्हिडिओ कॉलद्वारे अडकलेल्या अनेक नागरिकांशी संवाद साधला आहे.

मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गावंडे यांनाही जबाबदारी देण्यात आली असून त्यांनी दूतावासांसोबत बैठक घेऊन आवश्यक एसओपी नागरिकांपर्यंत पोहोचविल्या आहेत. या सूचनांची माहिती 'एक्स' (ट्विटर) खात्यावरूनही प्रसारित करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

केंद्र सरकारकडूनच परत आणण्याची प्रक्रिया

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्य शासनाने महाराष्ट्रातील नागरिकांना परत आणण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची तयारी दर्शविली होती. मात्र केंद्र सरकारने सध्या असुरक्षित हवाई वाहतुकीमुळे ही प्रक्रिया केंद्राच्या अखत्यारितच ठेवण्याचा सल्ला दिला आहे. विविध राज्यांनी स्वतंत्र प्रयत्न केल्यास गोंधळ निर्माण होऊ शकतो, असेही केंद्राचे मत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सध्या एअर इंडियाची काही विमाने संबंधित ठिकाणी जाऊ लागली असून टप्प्याटप्प्याने नागरिकांना परत आणले जात आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत परिस्थितीत सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री (पान २ वर....)

# मुंबई विमानतळावर कस्टमची कारवाई, स्मग्लिंगचा माल पकडला, विदेशी चलन, सोनं, माणिक, ड्रग्स जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत देश-विदेशातून मोठ्या संख्येने नागरिक, प्रवासी, उद्योगज आणि विविध क्षेत्रातील लोक येत असतात. त्यामध्ये, अनेकदा गुन्हेगारी आणि स्मग्लिंग करणाऱ्यांचाही समावेश असल्याचं पाहायला मिळतं. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई विमानतळावर कस्टम विभागाकडून सतर्क राहून कारवाई केली जाते. नुकतेच मुंबई विमानतळावर २४ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत कस्टम्सने मोठी कारवाई केली असून ड्रग्ज, विदेशी चलन, हायड्रोपोनिक वीड, हिरे, सोनं असे मौल्यवान आणि अंमली पदार्थ जप्त केले आहेत. विमानतळ आयुक्तालय, मुंबई कस्टम्स झोन-खखख कडून स्पॉट व झखड प्रोफाइलिंगच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई विमानतळातील कस्टम विभागाने वेगवेगळ्या ८ प्रकरणांत ४४.२९२ किलो हायड्रोपोनिक वीड (छऊझड) जप्त केले असून त्याचे आंतरराष्ट्रीय बाजारमूल्य अंदाजे ₹४४.२९२ कोटी एवढे आहे. तर, बँकॉकहून आलेल्या ९ प्रवाशांना छऊझड लीं १९८५ अंतर्गत अटक २९९ ग्रॅम मेथाक्वालोन जप्त; अवैध बाजारमूल्य ₹७४ लाख ७५ हजार एवढी आहे. तसेच, ५ प्रकरणांत ५ प्रवाशांकडून परकीय व भारतीय चलन मिळून ₹३२ लाख ८५ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत.

दागिन्यांसह हिरे, माणिक, नीलम जप्त

कस्टमच्या कारवाई ४५५ कॅरेट नैसर्गिक व लॅब-ग्रोन हिरे जप्त करण्यात आले असून त्याची किंमत ९४ लाख ९७ हजार एवढी आहे. २१ कॅरेट तुटलेले सोन्याचे दागिने (१६०.७९० ग्रॅम) जप्त केले आहेत. या दागिन्यांची बाजारभावाप्रमाणे किंमत २१ लाख ५१ हजार एवढी आहे.

# श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकासकामे भव्य, दिव्य आणि दर्जेदार व्हावीत : पालकमंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई : मराठवाड्याच्या श्रद्धास्थानाचा मुकुटमणी असलेल्या श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराच्या विकासकामांना भव्यतेची आणि दिव्यतेची नवी उंची देण्याचा निर्धार व्यक्त करत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.

कोट्यवधी भाविकांच्या अखंड श्रद्धेचे केंद्र असलेल्या या तीर्थक्षेत्राचा विकास केवळ आजचाच नव्हे, तर पुढील शंभर वर्षांचा विचार करून दूरदृष्टीने आणि उत्कृष्ट दर्जाने व्हावा, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत तुळजापूर येथील श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांच्या सोयी-सुविधा वाढविण्यासाठी हुडको पार्किंग परिसरात उभारण्यात येणाऱ्या भाविक सुविधा केंद्र, आधुनिक भक्तनिवास, व्यावसायिक संकुल, बहुउद्देशीय सभागृह आणि विस्तीर्ण वाहनतळ अशा विविध प्रकल्पांचा समावेश असलेल्या सुमारे ५८२.१७ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी विकास आराखड्याची माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. यासोबतच या कामासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादन आणि निविदा प्रक्रियेच्या प्रगतीचा देखील आढावा घेण्यात आला.

यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रकल्प नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेशी जोडलेला आहे. त्यामुळे या प्रकल्पात गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी. अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्मितीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास भव्य, आकर्षक आणि शाश्वत पद्धतीने करावा.

# शरद पवारच राज्यसभेचे उमदेवार, सुप्रिया सुळेंकडून घोषणा; काँग्रेस अन् ठाकरेंच्या शिवसेनेचा पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अर्ज भरण्यास उद्या स्वतः शरद पवार येण्याची शक्यता कमी असून विधिमंडळातील अधिकारीच सिल्व्हर ओक निवासस्थानी जाणार असल्याची माहिती आहे. शरद पवार यांच्या नावाला अखेर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला असून काँग्रेसकडून ते जाहीर करण्यता आलं आहे. तर, संजय राऊत यांनीही ट्विट करुन महाविकास आघाडी एक राहिल, असे म्हणत शरद पवारांच्या नावासा पाठिंबा असल्याचे सूचवले आहे. त्यामुळे, शरद पवार (डहरीरव झरुरी) हेच महाविकास आघाडीचे राज्यसभेचे उमेदवार असणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केलीय राज्यसभेच्या उमेदवारीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्याने महाविकास आघाडीकडून कोणाचे नाव निश्चित होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही पक्ष आग्रही होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडे संख्याबळ कमी असतानाही ज्येष्ठ नेते म्हणून दोन्ही पक्षाच्या प्रमुखांना शरद पवार यांच्या नावाला पाठिंबा दिला. खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन शरद पवारांच्या नावाची घोषणा केली, तसेच काँग्रेसच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांचे आणि उद्धव ठाकरेंसह शिवसेना पक्षाचे आभार मानले आहेत.

राज्याची ऊर्जा क्षेत्रात ४.१७ लक्ष कोटींची गुंतवणूक

५५ सामंजस्य करारांद्वारे ७८,२१५ मेगावॅट क्षमतेची उभारणी

# ऊर्जा क्षेत्राला सक्षम करण्यासाठी कालबद्धरित्या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत असून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठीचे विविध कंपन्यांसोबत एकूण ५५ सामंजस्य करार आज करण्यात आले आहेत. या करारांद्वारे ७८,२१५ मेगावॅट वीज निर्मिती क्षमतेची उभारणी प्रस्तावित आहे. एकूण गुंतवणूक सुमारे ₹४,१६,७०१ कोटी रुपये इतकी अपेक्षित असून या प्रकल्पाद्वारे सुमारे १,२७,९९० रोजगार निर्मिती होणार आहे. ऊर्जाक्षेत्राला सक्षम करण्यासाठी करार महत्वाचे असून कालबद्धरित्या या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

विधानभवनात राज्यातील उदंचन जलविद्युत प्रकल्पांची (पंपस्टोरेज प्रकल्प) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधितांना सूचित केले. बैठकीस जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांच्या सह जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर व इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात ऊर्जा क्षेत्राच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. या कामाची व्याप्ती वाढवण्याच्या दिशेने या क्षेत्रातील नामांकित विविध कंपन्यांसोबत राज्य शासनाने सामजस्य करार केले आहेत. आतापर्यंत एकूण ५५ सामजस्य करार हे उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीसाठी करण्यात आले आहेत. अल्पावधीतच या प्रकल्पांच्या कामाने गती घेतली असून ५५ पैकी १०३०० मेगा वॅट क्षमतेच्या सहा प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची मंजूरी मिळाली असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली आहे. तसेच ८२०० मेगावॅट क्षमतेच्या पाच प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीच्या टप्प्यात आहेत. या गुंतवणुकीमुळे राज्यातील ऊर्जा उत्पादन क्षमता लक्षणीय वाढणार असून औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. या प्रकल्पांच्या उभारणीचे काम गतीने पुढे जात असून विहित कालमर्यादेत हे प्रकल्प कार्यान्वित होतील यादृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले की, उदचंन जलविद्युत प्रकल्पांचे सामंजस्य करार १२ ऑगस्ट, ३ सप्टेंबर, २६ सप्टेंबर २०२४ तसेच २९ एप्रिल, १ व १५ जुलै, ३ नोव्हेंबर आणि १० डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले. प्रमुख कंपन्यांमध्ये अदानी ग्रीन एनर्जी लि. (९,९०० मेगावॅट, ₹५४,४५० कोटी, ३०,००० रोजगार), एनएचपीसी लि. (७,३५० मेगावॅट, ₹४४,१०० कोटी, ७,३५० रोजगार), जेएसडब्लू एनर्जी (८,२०० मेगावॅट, ₹३६,५१४ कोटी, १५,२०० रोजगार), टीएचडीसीआयएल (६,७९० मेगावॅट, ₹३३,६२२ कोटी, ६,३०० रोजगार) आणि टोरंट पॉवर लि. (५,६०० मेगावॅट, ₹२८,००० कोटी, १३,५०० रोजगार) यांचा समावेश आहे.

याशिवाय टाटा पॉवर कंपनी लि., एनटीपीसी लि., जेएसडब्ल्यू निओ एनर्जी लि., मेघा इंजि. अँड इन्फ्रा लि., वेलस्पन न्यू एनर्जी लि., रिन्यू हायड्रो पॉवर प्रा. लि., महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लि. आणि अवाडा क्ला बॅटरीज प्रा.लि या कंपन्यांनीही सामंजस्य करार केलेले आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

गुरुवार दि. ५ मार्च २०२६


## संपादकीय....

## संकटाचा अलर्ट

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पाचव्या दिवशी देखील कायम आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. याच दरम्यान हिंदी महासागरात अमेरिकेनं पाणबुडीचा वापर करत इराणच्या युद्धनौकेवर हल्ला केला, यात ८० जणांचा मृत्यू झाला आहे. युद्धनौकेतून प्रवास करणारे अनेक जण जखमी झाले आहेत. इराणी युद्धनौकेकडून संकटाचा अलर्ट देण्यात आल्यानंतर श्रीलंकेच्या सैन्यानं बचाव कार्य आणि शोध कार्य सुरु केलं. श्रीलंकेच्या नौदलाकडून आणि संरक्षण मंत्रालयाकडून या हल्ल्याला दुजोरा देण्यात आला आहे. इराणच्या जहाजावर एकूण १८० लोक होते, त्यापैकी ८० जणांचा मृत्यू झाला आहे. तर, ३२ जणांना वाचवण्यात यश आलं असून काही जण बेपत्ता आहेत. श्रीलंकेच्या संरक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलेल्या माहितीनुसार इराणच्या जहाजाकडून आपत्कालीन सिग्नल मिळाल्यानंतर श्रीलंकेच्या नौसेनेकडन बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. श्रीलंकेच्या नौदलाकडून इराणच्या जहाजावरील ३२ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. आता त्यांच्यावर रुग्णालयात उपचार आहेत. श्रीलंकेच्या विदेश मंत्री विजिता हेराथ यांनी म्हटलं की बुडणाऱ्या जहाजातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी किनाऱ्यावर आणलं गेलं आहे. अमेरिकेचे संरक्षण विभागाचे सचिव पेटे हेगसेठ यांनी हिंदी महासागरामध्ये टॉरपॅडोचा वापर करुन इराणच्या युद्धनौकेवर हल्ला केल्याचं म्हटलं. त्यांनी इराणच्या युद्धनौकेचं नाव सांगितलं नाही.या हल्ल्यासाठी अमेरिकेनं टॉरपॅडोचा वापर केल्याचं बोललं जात आहे. हेगसेठ यांनी इराणकडून डोनाल्ड ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला गेल्याचा दावा केला. हा कार्यक्रम विशाखापट्टणम येथे पार पडला होता. यानंतर इराणची युद्धनौका परत निघाली होती.

## परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित परत आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

कुवैत येथे ट्रान्झिटमध्ये असलेल्या काही प्रवाशांना व्हिसा नसल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र भारतीय दूतावासाच्या प्रयत्नांमुळे त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली असून त्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मिहीर कोटेचा यांनी दुबई येथे ओळखीच्या व्यक्तींच्या माध्यमातून अडकलेल्या नागरिकांसाठी दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था सुरू केली आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना या उपक्रमाचा लाभ होत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत परदेशातील भारतीयांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून परत आणण्याचा अनुभव केंद्र सरकारला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार या प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवून आहे, सर्व नागरिकांना सुरक्षित परत आणले जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

तेलसाठ्याबाबत सध्या देशाकडे सुमारे दोन महिन्यांचा साठा उपलब्ध असल्याने तातडीने दरवाढीची भीती नसल्याचे त्यांनी सांगितले.

# इंदू जन्माची चित्तरकथा.....!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुरूवार, ५ मार्च २०२६. इंदूचा चौथा स्मृतिदिन संपन्न होत आहे. त्यादिवशी बुद्धवंदना; पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण; आंबेडकरवादी कवीसंमेलन व दोन पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या स्मृतिदिनानिमित्त एक वेगळा सामाजिक, साहित्यिक व धार्मिक आशय रुजावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मुद्दामहून दोन पुस्तके या कार्यक्रमात धरणार आहे. १) असे होते आपले बाबा साहेब २) अंतरापेक्षा महत्वाची : गोष्ट बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व विचार.

इंदूचे दैनंदिन आयुष्य संघर्षाची मालिका आहे. धेयवाद उराशी बाळगून, प्रत्येक संकटाशी सामना करावा लागतो. अशाच संघर्षाचे नाव .... इंदु तुकाराम गायकवाड. वय ६५ वर्षे. इंदुबाई मुळच्या आष्टा कासार, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद येथील स्मृतीशेष तुकाराम गोविंद गायकवाड यांची कन्या.

इंदू आमच्यात नाही हे वास्तव आहे. परंतु ती कुठेतरी आहे. गावी आहे असेच वाटते. अस्तित्व आहे. असेच वाटत रहाते. परंतु बुद्धांने सांगितलं की 'हे सर्व संस्कार नाशवंत आहेत. तुम्ही प्रमादी राहू नका. अप्रमादी रहा. आपल्या मुक्तीसाठी स्वतः प्रयत्न करा. जो जन्मणारा आहे त्याचा मृत्यू होणार आहे. ज्याची सुरुवात आहे. त्याचा शेवट आहे. ज्याची निर्मिती त्याचा विनाश आहे. हा भगवान बुद्धाचा 'प्रतित्यसमुत्पाद' देखील आपण समजून घ्यायला हवा.

''अनिच्चा वत संखारा उप्पादवय धम्मियोनो / उपज्जित्वा निरूझ्झन्ति तेसं वुपसमो सुखो //

या स्मृतिदिनानिमित्त दोन शब्द.....

आम्ही सहा भावंडे, पाचबहिणी नंतरचे मी शेडेंफळ. वडील शेतमजूर. वडिलांना आम्ही दादा म्हणत. शेतावर मिळेल ते काम करणे. गावातील हलकी सलकी कामे करणे. संसाराचा गाडा ओढत आणला. सर्व मुलींची लग्ने लावून दिली. शिक्षण फारसे नव्हते. तसे कोणाचे मार्गदर्शन नव्हते. कोणाचाही आधार नव्हता. कोणाचं पाठबळ नव्हतं. तरी चंग बांधून आणि जिद्दीने संघर्ष करून समाज जीवन व्यतित केलं. अतिशय प्रामाणिक, कष्टाळू , त्यागी, कनाळूवृत्तीने जीवन जगता जगता निवर्तले.

दादांचे आचरण साधे, सात्विक व शुद्ध असायचे. स्वार्थासाठी केव्हाच खोटे बोलायचे नाही. वाड्यातील लहान थोरांशी ते आदराने बोलत. दादा पंचांग पाहायचे. मुहूर्त सांगायचे. बालकांचे काय नाव ठेवायचं ते सांगायचे. यामुळे लोक त्यांना 'महाराज' म्हणून तर काहीजण आदराने 'तुकाराम महाराज' म्हणायचे. लोक पाया पडायचे. इतर गल्लीतील लोक गृहप्रवेश किंवा घरावर मातीचा ईमला टाकला की सत्यनारायण घालत. दादा लग्न लावत, मंगलाष्टके म्हणत. दादांना लोक आहेर करायचे. आदराने वागायचे. मला ते कळायचे. लोक एवढा मान सन्मान देतात नंतर दादांनी हे सर्व सोडले. हळूहळू बाबासाहेब कळू लागले. बुद्ध कळू लागले. बाबासाहेबांची दरवर्षी जयंती व्हायची. लोक वंदना घेत, मिरवणुका काढत, रात्रभर जलसे, गायन होत, यामुळे लोकांचे हळुवारपणे प्रबोधन होऊ लागले. मुक क्रांतीला (Silent Revolution) सुरुवात झाली. बाबासाहेब 'आंबेडकर' आणी 'हिंदुधर्म' मधला फरक समजू लागला. आंबेडकरांच तत्त्वज्ञान माणसाला वाचवणार आहे तर हिंदुत्व माणसाला मातीत गाडणारे आहे. लक्षात येऊ लागले. विचारांचा ओढा निर्माण होऊ लागला.....

......तसेच, आमच्या घरी श्रावण महिन्यातला मधला सोमवार धार्मिक पणे साजरा होत असे. मधल्या खोलीत खांबाची पूजा बांधायचे. दिवे लावायचे. ते झाल्यावर पुरणाच्या पोळ्या, पापड, गुळवणी, भात जेवण असे. दादा-माय गावातील विठ्ठल रुक्माई मंदिरात भक्तीभावाने पोथी ऐकायचे. प्रसाद म्हणून लाह्या व रेवढ्या घरी आणायचे. तिथे आरती होत असे. सरतेशेवटी सप्ताह झाला की गव्हाची खीर करून प्रसाद म्हणून जेवण घालत. दादासोबत मी जायचो. सर्वजण खीर ओरपून खात. तो आवाज मजेशीर वाटायचा. आता पंगतीत तो आवाज हरवला आहे.

......पुढे पुढे मला हे सर्व थोतांड वाटायला लागले. धर्म, कर्मकांड, पूजा, नैवेद्य हे व्हिमझीकल वाटू लागले. सायकिक वाटू लागले. मी थेट विरोध करू लागलो. आईवडिलांशी



(दादा मायशी) हुज्जत घालू लागलो. हे सर्व आंबेडकरांची माणसं करत नाहीत. तुम्हाला सोडायला लागेल. याचा आग्रह धरू लागलो. मी गाणगापूरची यात्रा बंद केली. जत्रेला जाणे थांबले. वाचत होतो. भाषणे ऐकत होतो. माझे प्रबोधन होत होते. माझा दृष्टिकोन वैज्ञानिक बनत होता. कोणत्याही साहित्यात माणूस, माणुसकी, आणि मानवता पाहिजे सवय लागली. तरीही माय गावाकडे मला न माहिती देता यात्रेला जाऊन यायची. श्रद्धा होती तिची.

अशा आठवणी जागृत होतात. कुटुंबातील वास्तवता ठसठशीतपणे पुढे येते. मला लिहिते करते. दुःख, वेदना आणि नकार हा समाज जीवनात किती ओतप्रोत भरलेला होता. शब्दांना धुमारे फुटतात आणि समकालीन प्रश्नांचे मोहोळ उठते. आमच्या शालेय जीवनात गरिबीतून कुटुंब वाचवण्याचे आई-वडिलांची धडपड आणि घालमेल आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहत असायचो.

आम्ही घडत होतो. पाच बहिणींचा संसार सुरू झाला होता. आम्ही आईवडिलांच्या संस्कारामुळे तयार झालो. गरीब असलो तरी प्रामाणिक राहायचे . कोणाला फसवायचे नाही. उध्दट, गद्दार व मुजोर व्हायचे नाही. प्रज्ञा व शालींनता बरोबर घेऊन जीवन जगायचे हा मंत्र घेऊन जगत राहीलो. अंकुरत होतो. फुलत होतो. वास्तव परिस्थितीचे चटके सहन करत मोठे झालो. प्रत्येक दिवस आम्ही भुकेनी व्याकुळ असायचो.

ते दिवस काही करता स्मृतीपटलावरुन जात नाहीत. आई-वडील रानातून काहीतरी आणतात. शेंगाच्या वेल, ज्वारीची कणसे, हरभ-याचे ढाळे, वाळकं, इत्यादी...मग नंतर रात्रीचा मेनू ठरत असे. अंबाड्याची भाजी, ज्वारीच्या भाकरी, मिरच्याचा मीठ घालून केलेला खरडा, वा ज्वारीच्या कन्या शिजवून मीठ घालून खायचं... सकाळी बिनदुधाचा गुळाचा चहा हा आमचा ब्रेकफास्ट. दुपारचे व रात्रीचे जेवण एकदाच.

तशात आई वडील आमचा लाड करायचे. शाळेत जायचं फुटकी पाटी, पेन्सिल , फाटकी चड्डी घालून शाळेत जायचं. कोणताही गर्व नव्हता. श्रीमंतीचा लवलेशही नव्हता. तेव्हा अहंकार वा गर्व कसला असतो हे समजत नव्हते. माय -दादा अपरंपार दुःख झेलीत संसार करायचे. तशात माझा लाड केला जायचा. सर्व मुलीला उपवर होण्याच्या उंबरठ्यावर लग्ने लावून दिली. माय-दादाचा दोष नव्हता. समाजाची मानसिकता होती.

पुण्यात शिक्षणासाठी आमचा वेगळा संघर्ष चालू होता. शिक्षणाचे ध्येय उराशी बाळगून वाटचाल चालू होती.

शिक्षणाच्या निमित्ताने मी पुण्यात आलो. १९७२ चा दुष्काळ. प्रंचड गरिबी, दारिद्र्य, भूक आणि भय घेउन जगावं लागत असे. खायला अन्न नाही. घरात पीठ नाही. शेतावर काम नाही. जगायचे कसे... मोठा प्रश्न त्यावेळी असायचा.... दररोज दुष्काळी कामाची सुकडी व मिलो ज्वारी मिळायची. रोजगार हमी योजनेचे खड्डे मारून दिवस भरायचे. नवरा बायकोचा एका जोडीला एक खड्डा व्हायचा. अशा अवस्थेत इंदूच्या जन्माची चित्तरकथा..... ही वेगळीच अद्भुत व मनोरंजक तितकीच प्रेरणादायी......!

इंदू, आम्ही आणि आमचे कुटुंब दलित.... जातीने महार ...गावकुसाबाहेरचे.... भिमनगर.... वडिल इयत्ता चौथी शिकलेले. पोथीपुराण वाचत. गोसावी होते. पूजाअर्चा करायचे. घरात पितळी टाळ, चिपळ्या व वीना होता. समाज, संस्कृती भाषा, परिवर्तन, पुरोगामी विचार आणि आंबेडकर चळवळी जवळ येऊन थांबलेले. मार्गदर्शक कोणी नव्हते.

**इंदु आमच्या कुटुंबातली पाचवी कन्या.**

अनुक्रमे सुशीला, मिथिला, वत्सला, उल्पा आणी इंदू अशा पाचजणी. इंदू अतिशय बेधडक, सडेतोड व रोखठोक भूमिका घेणारी म्हणून आमच्या कुटुंबात उठून दिसणारी. मुळातच कुटुंब वा समाजजीवनातला भेदभाव, विषमता तिला मान्य नसायचा. उच्चनीचता, भेदभाव यावर कडाडून हल्ला करायची. भेदी नव्हती. कडक स्वभावाची. जीवनभर सद्भावना, सदाचार व शीलाने वागण्याचा प्रयत्न केला. इतरांनीही नीट आचरण करावे यासाठी ती सतत उपदेश करत असे. शिक्षण नव्हते. तरीपण शाळकरी मुंलीकडून तीने मुळाक्षरे शिकून घेतली होती. वर्तमानपत्र वाचत असे.

माणसाला जगायला कोणाचे तरी नैतिक बळ हवं. प्रोत्साहन हवे असते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य शिक्षण हि जशी नैसर्गिक गरज आहे. तशीच साहित्यदेखील नैसर्गिक गरज आहे. माणसाचं जीवन हे साहित्य असते. कागदावर शब्द कोरले की साहित्य बनते. इंदूची जीवनातील धडपड शब्दबद्ध केले की साहित्य होऊ शकते. शिकलेली नाही म्हणून काय झालं ? मलाही सिद्ध करता येते. व्यक्त होता येते. इतरांप्रमाणे स्वावलंबी जीवन जगता येते. यासाठी ती जिद्द बाळगून असायची. मीही माणूस आहे. माणसासारखा आत्मनिर्भर पणे जगता येणे कठीण नाही हे तिने सिद्ध करून दाखवले. हे खरे आहे. तसे तिचे जीवन एखादा कॅन्व्हासवर रंग भरण्यासारखे आहे. तिच्या जीवनाचे आधारस्तंभ आई-वडील (मायदादा) होते. प्रेरणास्थान माणून तिने वाटचाल केली. कोणाला आवडो न आवडो मी झुंज देत राहणार. मी वेदनेवर वा रोगावर मात करणार . अशी आशा बाळगून स्वतःशीच लढत राहिली.

गावात एकटी रहायची शेतावर इतर बायासोबत काम करायची. तिला श्वसनाचा आजार होता. दमा होता. औषधे घ्यायची वडिलोपार्जित घर तिने सुरक्षित ठेवले. हेच मोठं काम केले. एकटी रहात असताना लोकांची बोलणी, अवमान, उपहास सहन करत असे. शेतावर काम करताना तिला त्रास व्हायचा. परंतु तिने कोणाला सांगितले नाही. माझा भाऊ पुण्याला आहे. तो साहेब आहे. ही भावना बाळगून जीवन व्यतीत करत असे. काही दोन चार वर्षांपूर्वी पासून ती आमच्याकडे राहण्यास पुण्यात आली. एवढे काय सूख तिला लाभले असेल....!

इंदूस विनम्र आदरांजली....!!!

**– डॉ. दत्तात्रय गायकवाड, पुणे**

**मोबाईल : ९८६०५९१३०५**

# इस्त्रायल-इराण युद्ध : बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताची भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मध्यपूर्वेतील घडामोडींनी अलीकडील दिवसांत अत्यंत गंभीर वळण घेतले आहे. इस्त्रायल आणि इराण यांच्यातील दीर्घकालीन तणाव उघड लष्करी संघर्षात परिवर्तित झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. विशेषतः इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूची बातमी आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत आहे. या घटनेमुळे केवळ एका देशाच्या नेतृत्वात बदल झाला असे नाही, तर संपूर्ण मध्यपूर्वेतील सामरिक समीकरणे हलली आहेत.

संघर्षाचे स्वरूप आणि परिणाम

इस्त्रायलने इराणमधील महत्त्वाच्या लष्करी व रणनीतिक ठिकाणांवर केलेल्या कारवायांना इराणने क्षेपणास्त्र व ड्रोन हल्ल्यांनी प्रत्युत्तर दिल्याचे वृत्त आहे. या घटनांनी संघर्षाचे क्षेत्र विस्तारण्याची शक्यता निर्माण केली आहे. लेबनॉन, सीरिया आणि आखाती प्रदेशातील इतर गटही या समीकरणात ओढले जाऊ शकतात. त्यामुळे हा केवळ द्विपक्षीय प्रश्न न राहता व्यापक प्रादेशिक संकट ठरू शकतो.

या संघर्षाचे तात्काळ परिणाम ऊर्जा बाजारावर दिसू लागले आहेत. मध्यपूर्व हा जगातील कच्च्या तेलाचा महत्त्वाचा स्रोत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत अस्थिरता निर्माण झाली तर जागतिक पुरवठा साखळीवर मोठा परिणाम होऊ शकतो. तेल दर वाढल्यास त्याचे पडसाद सर्व अर्थव्यवस्थांवर उमटतात. महागाई, उत्पादन खर्च आणि वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता निर्माण होते.

याशिवाय जागतिक शेअर बाजारात अस्थिरता, गुंतवणूकदारांची सावध भूमिका आणि व्यापारातील अनिश्चितता ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवते. अमेरिका, रशिया, चीन आणि युरोपियन देश या संघर्षाकडे वेगवेगळ्या राजनैतिक दृष्टीकोनातून पाहत आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय ध्रुवीकरण तीव्र होण्याची शक्यता आहे.

भारताची रणनीतिक भूमिका

भारत या संकटाकडे अत्यंत संयमाने पाहत आहे. भारताचे दोन्ही देशांशी स्वतंत्र आणि महत्त्वपूर्ण संबंध आहेत. एका बाजूला इस्त्रायलसोबत संरक्षण तंत्रज्ञान, कृषी आणि सायबर सहकार्य आहे; तर दुसऱ्या बाजूला इराणसोबत ऊर्जा, व्यापार आणि चाबहार बंदर प्रकल्प यांसारखे सामरिक हितसंबंध आहेत. त्यामुळे भारतासाठी भूमिका निवडताना संतुलन राखणे आवश्यक आहे.

भारताची परराष्ट्र नीती रणनीतिक स्वायत्तता या तत्त्वावर आधारित आहे. कोणत्याही शक्तीगटात स्पष्टपणे सामील न होता राष्ट्रीय हित जपणे हा दृष्टिकोन दीर्घकाळापासून स्वीकारला गेला आहे. या संघर्षातही भारताने संवाद आणि राजनैतिक मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. युद्धाची तीव्रता कमी व्हावी आणि प्रादेशिक स्थैर्य राखले जावे, ही भारताची प्राथमिक अपेक्षा आहे.

ऊर्जा आणि आर्थिक आव्हाने


भारत मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आयात करतो. मध्यपूर्वेतील अस्थिरतेमुळे तेल दर वाढल्यास भारतीय अर्थव्यवस्थेवर दबाव निर्माण होऊ शकतो. महागाई वाढणे, रुपयावर परिणाम होणे आणि वित्तीय तूट वाढणे यांसारखी आव्हाने उभी राहू शकतात. त्यामुळे ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आणि दीर्घकालीन साठा धोरण अधिक मजबूत करणे आवश्यक ठरेल.

त्याचबरोबर मध्यपूर्वेत लाखो भारतीय नागरिक कार्यरत आहेत. त्यांच्या सुरक्षिततेची हमी देणे आणि आवश्यक असल्यास स्थलांतर व्यवस्था करणे हीदखील भारतासाठी महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर कूटनीतिक सक्रियता वाढवणे अपरिहार्य ठरते.

नेतृत्वातील बदल आणि प्रादेशिक समीकरणे

अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूच्या बातमीने इराणमध्ये नेतृत्व संक्रमणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा बदलांमुळे अंतर्गत राजकीय अस्थिरता वाढू शकते. इराणची धोरणात्मक भूमिका कठोर होईल की संवादात्मक मार्ग स्वीकारेल, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईल. या बदलांचा प्रभाव संपूर्ण आखाती प्रदेशावर पडू शकतो.

जर संघर्ष दीर्घकाळ टिकला, तर मध्यपूर्वेतील सत्ता संतुलनात मोठे बदल घडू शकतात. काही देश संरक्षणात्मक धोरण स्वीकारतील, तर काही राष्ट्रे नव्या युती शोधतील. या परिस्थितीत भारताने दीर्घकालीन हित लक्षात घेऊन बहुआयामी कूटनीती राबवणे आवश्यक आहे.



संधी आणि सावधगिरी

जागतिक अस्थिरतेत काही संधीही दडलेल्या असतात. पुरवठा साखळीतील बदल, गुंतवणुकीचे नवीन मार्ग आणि सामरिक सहकार्याच्या संधी भारतासाठी उपलब्ध होऊ शकतात. मात्र या संधींचा लाभ घेण्यासाठी अंतर्गत आर्थिक स्थैर्य, मजबूत पायाभूत सुविधा आणि सक्षम धोरण अंमलबजावणी आवश्यक आहे.

भारताने एकीकडे शांततेचा संदेश देत, दुसरीकडे राष्ट्रीय सुरक्षेची तयारी मजबूत ठेवणे आवश्यक आहे. समुद्री मार्गांची सुरक्षितता, सायबर सुरक्षा आणि संरक्षण क्षमतेत सातत्यपूर्ण गुंतवणूक ही दीर्घकालीन धोरणाची गरज आहे.

एकुणच, इस्त्रायल-इराण संघर्ष हा केवळ दोन देशांमधील लष्करी सामना नाही; तो जागतिक राजकारण, ऊर्जा सुरक्षितता आणि आर्थिक स्थैर्य यांवर परिणाम करणारा प्रसंग आहे. भारतासाठी ही कसोटीची वेळ आहे. संतुलित परराष्ट्र धोरण, ऊर्जा व्यवस्थापन आणि नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी या तिन्ही गोष्टी एकत्रित सांभाळाव्या लागतील.

जागतिक अस्थिरतेच्या या टप्प्यावर भारताने घाईगडबडीत भूमिका न घेता दीर्घकालीन राष्ट्रीय हित लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शांततेचा पुरस्कार करताना स्वायत्तता आणि सामर्थ्य या दोन स्तंभांवर उभे राहणे – हाच भारताच्या भूमिकेचा मूलमंत्र असावा.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर**
**महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# पडघ्यात मराठी राजभाषा दिनानिमित्त शिक्षकांचा गुणगौरव सोहळा उत्साहात



**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने जिल्हा परिषद मराठी शाळेत कार्यक्रम; मान्यवरांची उपस्थिती**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पडघा व पडघा परिसर यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा येथे मराठी शिक्षकांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मराठी भाषा जपणे व तिच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांचे कार्य गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला शाळेच्या माजी मुख्याध्यापिका ललिता अशोक कराडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. मराठी ही केवळ भाषा नसून आपल्या संस्कृतीची ओळख आहे. विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड निर्माण करण्याचे कार्य शिक्षक सातत्याने करत असतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, तालुकाध्यक्ष विकास जाधव, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष शशिकांत कथोरे, तालुका उपाध्यक्ष गुरुनाथ मते, भिवंडी संघटक नरेश शेलार, पडघा विभाग अध्यक्ष प्रताप विशे व सदानंद गोरले, पडघा शहर अध्यक्ष मनोज मराठा, उपविभाग अध्यक्ष आदित्य पाटील, पडघा उपशहर अध्यक्ष चंद्रकांत कदम तसेच अविनाश जाधव, सिद्धार्थ कांबळे आणि विद्यार्थी सेनेचे रितेश शेट्टी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, काव्यवाचन, भाषणे आणि नाट्यप्रयोग अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या शेवटी मराठी विषयात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमानाची भावना अधिक दृढ झाली असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बाभुळगाव येथील शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न लागला मार्गी

## शेतकऱ्यांना लाईट देणं महत्त्वाचे- आमदार अभिजीत पाटील; बाभुळगांव येथे ५एम.व्ही.ए. नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील बाभुळगांव येथे ५एम.व्ही.ए. उद्घाटन आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. बाभुळगाव सबस्टेशन येथील वाढीव ५एम.व्ही.ए ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन करण्यात आले.

इथून पुढे शेतकऱ्यांना विजेचा प्रश्न भेडसावणार नाही ५एम.व्ही.ए आधीचा ट्रान्सफॉर्मर असताना वाढीव क्षमतेसाठी ५एम.व्ही.ए चा नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न मार्गी लागलेला असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना लाईट देणं ही लोकप्रतिनिधी म्हणून मी माझी भूमिका पार पाडत आहे. बाभुळगाव मधील रेल्वे लाईन येथील विजेचा प्रश्न देखील येत्या काळात मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.


सध्या अधिवेशन सुरू असल्याने तमाम जनतेने आपल्या परिसरातील आपल्या गावातील, प्रश्न, समस्या अधिवेशनात मांडण्यासाठी द्यावे असे यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.





यावेळी वसंत चव्हाण, दिलीप चव्हाण, दशरथ चव्हाण, महादेव चव्हाण, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, सरपंच अमोल कोरके, जिल्हा परिषद सदस्य भारतबापू कोरके, जिल्हा परिषद सदस्य अमित साळुंखे, जिल्हा परिषद सदस्य संतोष बागल, पंचायत समिती सदस्य विलास भोसले, उपसरपंच श्रीपाद चव्हाण, पै.महादेव चव्हाण, जीवन काका पाटील, गणेश गांडुळे, उद्धव बापू चव्हाण, अमोल चव्हाण, मोहन पाटील, ओंकार चव्हाण, विठ्ठल कारखान्याचे संचालक जनक भोसले, दिनकर चव्हाण यांच्यासह महावितरणचे अधिकारी पाटणकर व सदानंद यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# ग्राम सुरक्षा यंत्रनेच्या प्रभावी व तात्काळ वापराने अपहरण झालेल्या मुलाचा १ तासात शोध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या तत्काळ व प्रभावी वापरामुळे,अपहरण झालेला १८ वर्षांचा मुलगा १ तासांमध्ये शोधण्यात पुणे-सातारा पोलिसांना यश.

मंगळवार ०३/०३/२०२६ रोजी राजगड पोलीस स्टेशन हद्दीतील कापूरव्होळ तालुका भोर जिल्हा पुणे गावातील उदयोजक लखन(शेठ) दळवी यांचा मुलगा कु.पृथ्वीराज लखन(शेठ)दळवी (वय १८ वर्षे) दुपारी ०१.३० वाजता कापूरव्होळच्या ब्रिज जवळून घरी जेवायला जात असताना अचानक ३-४ अज्ञात व्यक्तींनी काळया रंगाच्या XUV कारमधून अपहरण करुन घेऊन निघाले ते घटनास्थळावरुन मिळालेल्या माहितीनुसार कापूरव्होळ-सारोळा-वीर-मांडकी मार्गे त्याला घेऊन जात होते. त्याच्या वडिलांनी घटनास्थळी आरडा-ओरड करीत पाठलाग सुरु केला परंतू त्याचा काही फायदा झाला नाही. अपहरणकर्ते मुलाला घेऊन तिथून पळून गेले त्यांनी घाबरलेल्या अवस्थेत त्यांचे शिरवळ येथील मित्र लोकमतचे पत्रकार मुराद पटेल यांना कॉल केला आणि सर्व हकिकत सांगितली दोघे मिळून शिरवळ पोलीस स्टेशन या ठिकाणी पोहोचले आणि मुलाचे वडील लखन(शेठ) दळवी यांनी ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइन(१८००२७०३६००) नंबर वरून ही माहिती तात्काळ पुणे जिल्हा आणि सातारा जिल्ह्यातील संपूर्ण गावांना आणि सर्व पोलीस स्टेशनला कळवली. त्यामुळे तत्काळ राजगड, खंडाळा, जेजुरी, सासवड, शिरवळ, लोणंद, भुईंज, फलटण ग्रामीण, सारोळा व भुईंज हायवे पोलीस इ.पोलीस स्टेशनचे अधिकारी-अंमलदार तसेच ग्रामस्थ एकत्र येत अपहरणकर्ते यांचा पाठलाग सुरू झाला. गावोगावी गावकऱ्यांनी ही नाका बंदी करण्यास सुरुवात केली. ग्रामस्थ आणि पोलीस एकत्र येत शोध मोहीम युद्ध पातळीवर सुरू झाली.आणि मांडकी गावामध्ये अपहरणकर्ते यांनी गाडी व कु. पृथ्वीराज लखन (शेठ) दळवी याला सोडून त्या ठिकाणावरून पोबारा केला.मुलाला सुखरूप पाहून पोलीस, मुलाचे वडील आणि कापूरव्होळ ग्रामस्थांचा जीव भांड्यात पडला आणि मोठा अनर्थ टळला.

कापूरव्होळ ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच,ग्रामपंचायत सदस्य,ग्राम पंचायत अधिकारी व पोलीस पाटील यांच्या प्रयत्नातून गावात ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावी राबविली जात आहे.

आजवर कापूरव्होळ गावात ग्रामसुरक्षा यंत्रणेचा विविध सूचना देण्यासाठी १२ वेळा वापर करण्यात आला आहे.

पुणे ग्रामीण पोलीस दलाचा उपक्रम असणाऱ्या ग्राम सुरक्षा यंत्रणेत जिल्ह्यातील ११९६ गावे सहभागी आहेत.जिल्ह्यातील ११.२५ लाख नागरिक यंत्रणेत सहभागी आहेत. आजवर जिल्ह्यात ३५४८० वेळा यशस्वी वापर करण्यात आला आहे.

संकट काळात आपत्तीग्रस्त नागरिकाने ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोल फ्री नंबर १८००२७०३६००/९८२२११२२८१ वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तत्काळ ऐकवला जात असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होतआहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेचा यशस्वी वापर करण्याबाबतचे निर्देश जिल्हा परिषद कार्यालय व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्याकडून देण्यात आले आहेत.

**ग्राम सुरक्षा यंत्रणेची उद्दिष्ट**

■ घटनाग्रस्त नागरिकांना परिसरातील नागरिकांची तातडीने मदत मिळणे.

■ गावातील कार्यक्रम / घटना विना विलंब नागरीक/ग्रामस्थांना एकाच वेळी कळवणे.

■ अफवांना आळा घालणे.

■ प्रशासनाला नागरिकांशी जलद संवाद साधता येणे.

■ पोलीस यंत्रणेस कायदा व सुव्यस्था कायम राखणे कामी नागरिकांचे सहकार्य मिळणे.

**ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये**

■ संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा

■ गावासाठी यंत्रणा सुरु करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पद्धत

■ संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर १८००२७०३६००/९८२२११२२८१

■ यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो.

■ संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरुपात परिसरातील नागरिकांना मिळतो.

■ दुर्घटनेचे स्वरूप, तीव्रता , ठिकाण कळल्याने गावकऱ्यांना विना विलंब व नियोजनबद्ध मदत करता येते.

■ नियमानुसार दिलेले संदेशच स्वयंचलित रित्या प्रसारित होतात

■ नियमाबाह्य दिलेले संदेश/ अपूर्ण संदेश रद्द होतात व प्रसारित होत नाहीत.

■ एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य.

■ वाहन चोरीचा संदेश आजूबाजूच्या १० किमी परिसरातील सर्व दिशांच्या गावांना तत्काळ मिळतो.

■ घटनेच्या तीव्रतेनुसार कॉल रिसीव्ह होत नाही, तोपर्यंत रिंग वाजते.

■ संदेश पुढील १ तास पुन्हा पुन्हा ऐकण्याची सोय. कोणत्याही वेळी आपल्यासाठी संदेश तपासण्याची सोय.

■ चुकीचा संदेश किंवा मिसकॉल देणारे नंबर आपोआप Black List होतात.

■ गावाबाहेर दुसऱ्या गावात अपघातग्रस्त नागरिकाचा संदेश घटना घडलेल्या परिसरातही प्रसारित होतात.

■ सरकारी कार्यालये/ पोलीस स्टेशन आदींना आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना किंवा विशिष्ट एक किंवा एकापेक्षा जास्त गावांना किंवा कर्मचाऱ्यांना सूचना / आदेश देता येणे शक्य होत आहे.

# उमरगा येथे 'लाईनमन दिन' उत्साहात साजरा; वीजदूतांचा हेल्मेट व पुष्पगुच्छ देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : रात्रंदिवस, ऊन-वारा आणि पावसाची तमा न बाळगता जनतेला अखंड वीजसेवा देणाऱ्या 'लाईनमन' (वीजदूत) यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी उमरगा उपविभागाच्या वतीने 'लाईनमन दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कर्तव्यदक्ष लाईनमनचा सन्मान करत त्यांच्या सुरक्षिततेचा संदेशही देण्यात आला.

**मान्यवरांची उपस्थिती**

या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा उपविभागीय अधिकारी सचिन रेकूलवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त कार्यकारी अभियंता दिपक कोथले, सोलापूर ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. काशिनाथ भतगुणकी यांची उपस्थिती होती.

तसेच व्यासपीठावर सहाय्यक अभियंता औदुंबर मोरे, जोतिर्लिंग हिंगमिरे, दिलीप भोसले, सचिन



वाघमारे, अलीम सय्यद, गणेश शेम्बळे आणि नेहा वावगे यांसह महावितरणचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सुरक्षिततेला प्राधान्य: हेल्मेट देऊन सत्कार**

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे उमरगा उपविभागांतर्गत येणाऱ्या विविध शाखांमधील लाईनमनचा झालेला सत्कार. यामध्ये उमरगा, तुरोरी, मुरूम, माडज, बलसुर या सातही शाखांमधील सर्व लाईनमनचा महावितरणच्या वतीने पुष्पगुच्छ आणि कामाच्या वेळी सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असलेले 'हेल्मेट' देऊन गौरव करण्यात आला. तुमचे जीवन मौल्यवान आहे, त्यामुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षा साधनांचा वापर करा, असा मोलाचा संदेश यावेळी देण्यात आला.

**उत्साही वातावरण**

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून लाईनमनच्या कष्टाचे कौतुक केले. आपल्या शाखेतील कर्मचाऱ्यांचा सन्मान होताना पाहून उपस्थित सर्वांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

> **लाईनमन हा महावितरणचा मुख्य कणा आहे. स्वतःच्या जिवाची बाजी लावून ते अंधार दूर करण्याचे काम करतात. त्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे.**
> **– सचिन रेकूलवाड (उपविभागीय अधिकारी)**

### तणावमुक्त जीवनासाठी सकारात्मक जीवन जगा : काशीनाथ भतगुणकी

**जीवनातील प्रत्येक क्षण आनंदी रहा, परिवाराला वेळ द्या, मोठे ध्येय ठेवा कायम व्यस्त राहा निरोगी रहा, असे विचार बुधवारी लाईट मॅन दिनी व्यक्त केले ते उमरगा येथील महावितरण कंपनीने आयोजित लाईटमॅन दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.**

# महापालिका तिजोरीची चावी रंजिता चाकोते यांच्या हाती!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाने आपली पकड पुन्हा एकदा घट्ट केली आहे. अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती सभापतीपदी भाजपच्या रंजिता चाकोते यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या पदासाठी केवळ चाकोते यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली.

या विजयामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

राजकीय वर्चस्व अबाधित

या निवडीमुळे सोलापूरच्या राजकारणात पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या गटाचे महापालिकेतील वजन वाढले असल्याचे मानले जात आहे. पक्षांतर्गत रणनीती यशस्वी ठरवत भाजपने चाकोते यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले, ज्यामुळे विरोधकांना कोणतीही चाल रचण्याची संधी मिळाली नाही.

### रंजिता चाकोते यांची स्थायी समिती सभापतीपदी बिनविरोध निवड

**मराठा समाजाची नाराजी आणि राजकीय चर्चा**

सोलापुरात सध्या मराठा आरक्षणाचे पडसाद उमटत असून, समाजाच्या वतीने आंदोलने सुरू आहेत. महापौरपद मराठा समाजाला न मिळाल्याने समाजात काही प्रमाणात नाराजी होती. त्यामुळे 'तिजोरीची चावी' मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या सभापती पदावर मराठा समाजाला संधी मिळेल, अशी दाट शक्यता वर्तवली जात होती. मात्र, भाजपने रंजिता चाकोते यांना संधी देऊन आपली जुनी रणनीती कायम ठेवली, ज्यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

**स्थायी समितीचे महत्त्व**

महानगरपालिकेच्या कामकाजात स्थायी समितीला 'सर्वात शक्तिशाली' मानले जाते.

अर्थसंकल्प: पालिकेच्या बजेटला अंतिम स्वरूप देणे.

विकासकामे: शहरातील मोठ्या विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी देणे.

आर्थिक निर्णय: प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणि मंजुरी.

रंजिता चाकोते यांच्या निवडीनंतर आता आगामी काळात शहरातील

विकासकामांना किती गती मिळते आणि सत्ताधारी भाजप जनतेच्या अपेक्षा कशा पूर्ण करते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

**उद्योजक सुनील रुंगठा यांकडून दोन लाख ऐंशी हजारांचे १०० बँचेस तर इतर दानशूरांकडून एक लाख चाळीस हजारांचे ५० बँचेस भेट**

# पालखेड विद्यालयास तब्बल चार लाख वीस हजार रुपयांच्या बँचेसची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

व्यवसायातसचोटी,प्रामाणिकपणा ह्या तत्वमाध्यमातून व्यवसाय करत असतांना जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण भागातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी आपले काही देणे लागते या उदात्त भावनेने भिवंडी येथील रुंगठा सिझिंग वर्क्स प्रोसेसर्सचे प्रतीथयश उद्योजक सुनील रुंगठा यांनी त्यांच्या मातोश्री विमलादेवी उमाशंकर रुंगठा यांच्या स्मृतीपित्यर्थ कंपनीच्या सी.एस.आर.फंडातून महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयास तब्बल दोन लाख ऐंशी हजार रुपये किमतीचे शंभर बेंचेस भेट दिले.

या धोरणात्मक निर्णयामुळे पालखेड विद्यालयातील पायाभूत सुविधा मजबूत होणार असून सदर उपक्रमामुळे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या एकाचवेळी बसण्याच्या सुविधेचा प्रश्न सुटला आहे.यामुळे वर्गखोल्यांमध्ये शिस्तबद्धता वाढण्यास मदत होणार आहे.तसेच विद्यार्थ्यांना अधिक आरामदायी वातावरणात शिक्षण घेता येणार असून यामुळे शाळेच्या एकूण शैक्षणिक वातावरणातही सकारात्मक बदल निर्माण होणार आहे.विद्येच्या मंदिरासाठी या सर्व दानशूर व्यक्तींना एकत्र करून समन्वय साधण्यासाठी पालखेड विद्यालयाचे माजी विद्यार्थी, ठाणे येथील ऊर्जा विभागाचे सहाय्यक विद्युत निरीक्षक अर्जुन विश्वनाथ जाधव, ग्लोबल ऑपरेशन प्रोजेक्ट मॅनेजर संतोष काळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.या सर्व दानशूर व मदतगारांनी दाखविलेल्या दातृत्वामुळे महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे,मुख्याध्यापक अशोक शेळके आदींनी आभार व्यक्त केले आहे. यामुळे समाजातील सक्षम व्यक्तींनी शिक्षण क्षेत्राला सहकार्य करून सामाजिक उत्तरदायित्व पार पाडावे असाही संदेश या माध्यमातून मिळाला आहे.

### विद्येच्या मंदिरासाठी केलेल्या सामाजिक उत्तरदायित्वामुळे सर्वत्र कौतुक

**यांचीही एक लाख चाळीस हजार रुपयांच्या ५० बँचेसची भेट**

डोंबिवली येथील उद्योजक नारायण कुलकर्णी,मुंबईचे ऊर्जा विभागातील विद्युत निरीक्षक निलेश मदाने,सुधीर राठोड,भिवंडीचे ठेकेदार राजू चौबे,पालखेड विद्यालयाच्या माजी प्रयोगशाळा सहाय्यक शोभाताई विश्वनाथ जाधव यांनीही २८ हजार रुपये किंमतीचे प्रत्येकी १० बँचेस प्रमाणे एक लाख चाळीस हजार रुपये किंमतीचे एकूण ५० बँचेस न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड विद्यालयास भेट दिले आहेत.



# ग्रंथ वाचनाने ज्ञान प्राप्ती होऊन माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो

## डॉ.सोमनाथ रोडे; ग्रंथालयाचे जिल्हा अधिवेशन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागदरी (एस.के. गायकवाड) : ग्रंथ वाचनाने माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तन होते ज्ञानप्राप्ती होते आणि माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो तेंव्हा वाचन संस्कृती जपली पाहिजे,वाढवली पाहिजे आणि गावोगावी ग्रंथालय झाले पाहिजेत नव्हे ती एक काळाची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे (लातुर ) यांनी खुदावाडी तालुका तुळजापूर येथे आयोजित धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघाच्या अधिवेशनामध्ये बोलताना केले.

तुळजापूर तालुक्यातील शेतकरी वाचनालय खुदावाडी या ग्रंथालयाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने या ग्रंथालयाचा सुवर्ण महोत्सव वर्धापन दिनाचे अवचित साधून धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने दरवर्षी होणारे ग्रंथालयाचे जिल्हा अधिवेशन हे ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.व.ग.सूर्यवंशी व थोर समाजसेवक डॉ.सिद्रामाप्पा खजुरे यांच्या मार्गदर्शनाखाली खुदावाडी तालुका तुळजापूर येथे धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघ अधिवेशन २२५-२६ चे आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.कमलाकर दादा कबाडे हे होते तर या अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त प्राध्यापक तथा इतिहासाचे अभ्यासक डॉ.सतीश कदम हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमानजी ढाकणे,प्राध्यापक मनोहर कबाडे,सरपंच श्रीमती सरोजिनी रेवणाप्पा कबाडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य रोडे म्हणाले की जो समाज वाचन संस्कृती जोपासतो तो समाज प्रगल्भ आणि सुसंस्कृत बनतो तेंव्हा सध्याच्या सोशल मीडियाच्या आव्हाणाला सामोरे जाताना वाचन संस्कृती जोपासव्या करिता गावा गावात ग्रंथालय काढणे गरजेचे असून शासनाने ग्रंथालय निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे व ग्रंथालयांना भरीव असे अनुदान देणे महत्त्वाचे आहे.

तर इतिहासाचे अभ्यासक प्रा.डॉ. सतीश कदम आपल्या भाषणात म्हणाले की ग्रंथालयाचे जनक एस.आर. रंगनाथन हे आहेत त्याना मी सर्व प्रथम आभिवादन करतो परंतु ग्रंथालय चळवळीचा इतिहास हा भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरना ग्रंथ वाचनाचा फार मोठा व्यसंग होता.त्यामुळेच त्यांच्या सर्वांग व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन ते आज जागतिक पातळीवर महामानव म्हणून प्रकांड पंडित म्हणून ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जात आहेत.आपण आपल्या कुटुंबासाठी आपल्यासाठी घर बांधतो पण पुस्तकासाठी घर बांधणारा एकमेव महामानव म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. तेंव्हा वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथालय चळवळीला गती देणे ही काळाची गरज आहे.

या प्रसंगी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथून ग्रंथपाल म्हणून सेवानिवृत्त झालेले व शेतकरी वाचनालय खुदावाडी चे मुख्य संचालक वसंतराव चिंचोले यांचा ग्रंथालय संघाच्या वतीने व शेतकरी वाचनालय खुदावाडीच्या वतीने मानपत्र देवून विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष व.ग.सूर्यवंशी यांनी केले तर उपस्थितांचे स्वागत डॉ.सिदाम खजूरे यानी केले व सूत्रसंचलन सेवानिवृत्त शिक्षक साहित्यिक कवि मनोहर घोडके यांनी केले तर आभार प्रदर्शन




तुकाराम बोंगरगे यांनी केले.

या वेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमंतजी ढाकणे व इतर मान्यवरांचेही मार्गदर्शनपर भाषणे झाली.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बापू बांगरगे, अनंत अहंकारी सह जिल्ह्यातील सर्व ग्रंथालय संचालक,कर्मचारी व वाचक महिला ग्रामस्थ युवा कार्यकर्ते साहित्यिक नवोदित साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळेंचा ८३ वा वाढदिवस साधेपणाने साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : शैक्षणिक,राजकीय व सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे यांचा ८३ वा वाढदिवस कोणताही बडेजाव न करता घरगुती पध्दतीने साजरा करण्यात आला,

याप्रसंगी शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळे यांच्या वाढदिवसानिमिताने संस्थेच्या सहा शाखांत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आले. महाराष्ट्र शिक्षण संस्थेत दीड लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन घेतले आहेत. सद्यस्थितीत नाशिक व आहिल्यानगर जिल्ह्यात विस्तारलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या निमगाव जाळी,तळेगाव दिघे ता संगमनेर,पालखेड(मिरचीचे), उगाव ता. निफाड,मऱ्हळ,भोकणी ता.सिन्नर आदी ठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये असून संस्थेचे आजतागायत अनेक विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी तसेच कृषी, शैक्षणिक, सामाजिक,राजकीय क्षेत्रात कार्यरत राहून आपल्या कामाचा उल्लेखनीय ठसा उमटवत आहेत,

वाढदिवसानिमित्ताने राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी विशेष शुभेच्छा दिल्यात,तसेच माजी




### संस्थेच्या शाळांत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम

आमदार डॉ सुधीर तांबे,संगमनेरच्या माजी नगराध्यक्षा सौ दुर्गाताई तांबे,आमदार सत्यजित तांबे,नगराध्यक्षा मैथिली तांबे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, मुंबईचे माजी जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर अनिल कांदळकर, कोपरगाव भाजपाचे तालुकाअध्यक्ष शरद थोरात,महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,कार्यकारी संचालक उपप्राचार्य दीपक जोंधळे,सचिव दत्तात्रेय जोंधळे, विनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मधुकरराव ढोमसे ,साखर कारखान्याचे संचालक इंद्रजित थोरात,सामान्य प्रशासनाचे मंत्रालयीन अवर सचिव सतीश जोंधळे,प्रवरा बँकेचे व्हा चेअरमन मच्छिंद्र थेटे, निमगाव जाळीचे सरपंच प्रतिभा जोंधळे,तळेगाव दिघेचे माजी सरपंच बाबासाहेब कांदळकर,संगमनेर शेतकरी संघांचे संचालक सचिन दिघे,पालखेडच्या सरपंच अश्विनी शरद आहेर,उपसरपंच सुनीता कोकाटे यांसह सदस्य,सोसायटी चेअरमन ज्ञानेश्वर जाधव,पालखेड स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोक आहेर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक पालक संघाचे सहसचिव विजय आहेर आदींनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ट महाविद्यालयाचे प्राचार्य हरिभाऊ दिघे,उपप्राचार्य संजय दिघे,पर्यवेक्षक बी.सी.दिघे,पंडित नेहरू व सत्यभामा राणूजी जोंधळे कनिष्ट महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब गागरे, पर्यवेक्षक प्रताप जोंधळे, न्यू इंग्लिश स्कूल पालखेड चे मुख्याध्यापक अशोक शेळके,देवराम महाराज हायस्कूलचे मुख्याध्यापक दिलीप रानडे, पर्यवेक्षक रामनाथ कुटे ,न्यू इंग्लिश स्कूल भोकणीचे मुख्याध्यापक बी.एस.मोरे,छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक के.ए.गवळी,पर्यवेक्षक नंदराम ढिकले आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्यात, याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदी उपस्थित होते

# एम. एम. पवार यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव
जप जीवाला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विद्या मंदिर, मांडा-टिटवाळा येथील सहाय्यक शिक्षक एम. एम. पवार यांना नुकतेच राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

एम. एम. पवार हे गेली पावशतक विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य करीत असून ते सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. त्यांच्या अध्यापनातून शाळा, गाव आणि देशाचे भविष्य घडविणारी गुणवंत पिढी तयार होत असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गार काढले. त्यांच्या आदर्श कार्यामुळे राष्ट्रउभारणीला शाश्वत बळ मिळत असल्याची




भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष एन. ए. कदम, सचिव तुकाराम मोंडकर, निवड समिती अध्यक्ष किसन बोंद्रे तसेच उपाध्यक्षा करुणा बांगर यांच्या हस्ते पवार यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानाबद्दल एम. एम. पवार यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निफाड श्रीराम क्लासेसचे 'एनएमएमएस'मध्ये घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी
निफाड एज्युकेशन फाउंडेशन संचलित श्रीराम क्लासेसने स्पर्धा परीक्षांच्या यशपरंपरेत आणखी एक उज्वल अध्याय जोडला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यंदा श्रीराम क्लासेसने घवघवीत यश मिळवले आहे.



एकूण २८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेला बसून तब्बल २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून दरवर्षी १२,००० रुपये शिष्यवृत्ती मिळणार असून, त्यांच्या पुढील शिक्षणासाठी भक्कम आर्थिक पाठबळ निर्माण होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही संधी खऱ्या अर्थाने शिक्षणातली शिदोरी ठरणार आहे.

या उल्लेखनीय यशामागे श्रीराम क्लासेसचे संचालक उल्हास पाटील, संचालिका सविता पाटील तसेच सर्व समर्पित शिक्षकवृंद यांचे बारकाईचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम व विद्यार्थीकेंद्री उपक्रमाचा मोलाचा वाटा आहे. नियमित सराव चाचण्या, निकालांचे सखोल विश्लेषण आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच मानसिक पातळीवर केलेले भक्कम मार्गदर्शन याचे हे फलित असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

निफाडमध्ये स्पर्धा परीक्षा असो किंवा शालेय परिक्षा – प्रत्येक वेळी अव्वल स्थान पटकावण्याची परंपरा श्रीराम क्लासेसने कायम ठेवली असून. एनएमएमएसमधील हे यश केवळ संस्थेचा गौरव नसून, निफाड तालुक्यातील शैक्षणिक जाणीवा आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाचीही पावती आहे. सर्व यशस्वी विद्यार्थी मित्रांचे परीसरातुन अभिनंदन केले जात आहे

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने वाशिम येथे २७ वे राज्यव्यापी अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्थळ वाशिम वाटाणे लोन येथे संपन्न.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अधिवेशन २०२६ वाशीम येथे मोठ्या उत्साहात संपन्न व पत्रकारांना पुरस्कार सोहळा गणेश सुरजसे पत्रकार जिल्हाध्यक्ष अकोला यांना राज्यस्तरीय संघटक पुरस्कार प्राप्त. सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

व पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री राजेंद्र कोरके पाटील यांना पश्चिम महाराष्ट्राचा संघटनात्मक पुरस्कार सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. महाराष्ट्र राज्य




पत्रकार संघाचे महासचिव डॉक्टर विश्वासराव आरोटे तथा नवनाथ जाधव प्रदेश प्रसिद्धीप्रमुख तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष व विभागीय अध्यक्ष यांना सन्मानित करण्यात आले. अनेक महात्मे महाराज तसेच गुरुदेव सेवा संस्थाची तुकडोजी महाराज यांचे अनेक शिष्यसह मान्यवर मोठ्या संख्येने कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. यांनी सर्वांचा सन्मान करून प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजक निलेश सोमानी वाशिम प्रदेश कार्याध्यक्ष यांना व त्यांच्या संपूर्ण टीम ने केलेले हे विशेष पण त्या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष, तसेच जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष, असंख्य संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सोलापूर जिल्ह्यातून पंढरपूर तालुक्यातून पंढरपूर तालुकाध्यक्ष रोहन नरसाळे, पंढरपूर शहर कार्याध्यक्ष नितीन करंडे, तालुका कार्याध्यक्ष अतुल मोरे, रामदास नागटिळक, संतोष मोरे, प्रमोद भोसले, शंकर कदम, राजेंद्र करपे, लक्ष्मण शिंदे, कुमार कोरे, गणेश माने, राजेश बदली पाटील, धनाजी राक्षे, स्वागत खपाले, महेश कदम, विक्रम कदम इत्यादी उपस्थित होते.

### टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये क्रीडा सह्याद्रीला प्रथम पारितोषिक

### जय मातादी क्लब निफाड द्वितीय पारितोषिक

# निफाड येथे पंधरा वर्षाआतील टेनिस क्रिकेट स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : क्रीडा सह्याद्री तालुकास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत क्रीडा सह्याद्री संघाने विजेतेपद पटकावले. जय माताजी क्लब निफाड संघाने उपविजेतेपद संपादन केले. शिव अविष्कार निफाड व सरस्वती विद्यालय निफाड तृतीय पारितोषिक मिळाले

क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिक व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक व निफाड तालुका टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १५ वर्षांखालील तालुकास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धा निफाड येथील सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात घेण्यात पार पडल्या

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, निफाड इंग्लिश स्कूलचे चेअरमन नंदलाल चोरडिया, नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन सचिव व क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिक अध्यक्ष विलास गायकवाड, मराठी पत्रकार संघाचे निफाड तालुका अध्यक्ष सागर निकाळे युवानेते सचिन खडताळे क्रीडा सह्याद्री सदस्य कय्युम कादरी ,रोहन राऊत, , रमेश वडघुले, विनोद गायकवाड, राहुल कुलकर्णी, आदी मान्यवर उपस्थित होते.

तालुका स्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत १३ संघानी सहभाग नोंदवला होता. या तालुकास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी युवानेते सचिन खडताळे व कय्युम कादरी यांच्याकडून तीन हजार रुपये, द्वितीय पारितोषिक मराठी पत्रकार संघाचे निफाड तालुका अध्यक्ष तथा माणुसकी सामाजिक फांऊडेशन चे संस्थापक सागर निकाळे यांनी दोन हजार रुपये व माहिती अधिकार व पत्रकर संरक्षण समिती उत्तर महाराष्ट्र राहुल कुलकर्णी व विनोद गायकवाड यांच्याकडून प्रथम व द्वितीय चषक देण्यात आला.

या स्पर्धेचा अंतिम सामना क्रीडा सह्याद्री विरुद्ध जय माताजी कल्ब निफाड यांच्यात झाला. क्रीडा सह्याद्रीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करत संघाला विजेतेपद मिळवून दिले. जय मातादी क्लबला उपविजेयी पदावर समाधान मानावे लागले. शिव अविष्कार निफाड व सरस्वती विद्यालय निफाड तृतीय पारितोषिक मिळाल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, , क्रीडा सह्याद्री अध्यक्ष विलास गायकवाड,



विनोद गायकवाड, राहुल कुलकर्णी,रोशन राऊत, चेतन कुंदे, रमेश वडघुले, दत्तू रायते, श्याम चौधरी यांनी विजेत्या व उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले. पंच म्हणून, आदित्य वाघ ,वेदांत पडले, दक्ष गायकवाड, सिध्दांत मेमाने यांनी काम बघितले.